# जाहिरात

## जिल्हा शल्यचिकित्सक,सामान्य रुग्णालय, गडचिरोली

### वॉक इन इंटरव्हयू व्दारे तदर्थ वैद्यकीय अधिकारी यांची कंत्राटी पध्दतीने पदे भरण्याबाबत थेट मुलाखत

मा. अध्यक्ष जिल्हा निवड समिती तथा जिल्हाधिकारी, गडचिरोली यांचे अध्यक्षतेखाली गठीत करण्यांत आलेल्या निवड समितीव्दारे जिल्हांतर्गत सामान्य रुग्णालय, उपजिल्हा रुग्णालय, ग्रामीण रुग्णालय, आणि प्राथमिक आरोग्य केंद्रातील महाराष्ट्र आरोग्य सेवा (गट-अ) यांची रिक्त पदे तातपुरत्या स्वरुपात भरावयाची आहे.

सरदहू तदर्थ वैद्यकीय अधिकारी यांची कंत्राटी पदे भरण्यासाठी प्रत्येक महिन्याच्या २ रा व ४ था सोमवारी वॉक इन इंटरव्हयू दुपारी १२.०० ते ३.०० वाजेपर्यत (शासकीय सुटीचे दिवस वगळून) मा. जिल्हाधिकारी कार्यालय, गडचिरोली येथे आयोजित करण्यांत येत आहे. **तरी इच्छकांनी एमबीबीएस/विशेषज्ञ अर्हताधारक उमेदवारोनी जिल्हा शल्यचिकित्सक, सामान्य रुग्णालय, गडचिरोली येथील संबंधित विभागाकडे अर्ज व सर्व प्रमाणपत्र मंगळवार ते शुक्रवार या कालावधीत सादर करावे.**

उमेदवारांनी येतांना सोबत एम.बी.बी.एस व विशेषज्ञ पदासाठी पदव्युत्तर पदवी/पदविका यांचे सर्व वर्षांचे गुणपत्रिका, पदविका/पदवी प्रमाणपत्र, वैद्यकीय परिषदेचे नोंदणी प्रमाणपत्र, वयाचा दाखला,जात व जात पडताळणी प्रमाणपत्र, अनुभव प्रमाणपत्र, अलीकडील पासपोर्ट साईजचा फोटो व इतर आवश्यक प्रमाणपत्रांची मूळ व छायांकित प्रतीचा एक संच, फोटो असलेले ओळखपत्र इत्यादसोबत घेवून येणे आवश्यक आहे.

**पदांचे विवरण** :- १. सामान्य रुग्णालय/उपजिरु व ग्रामीण रुग्णालय — १२
२. प्राथमिक आरोग्य केंद — ३२

अ) एम.बी.बी.एस पदाकरिता आदिवासी दुर्गम भागात रु. ४५,०००/- व इतर भागात रु. ४०,०००/- एवढे मानधन राहील.
ब) विशेषज्ञ पदाकरिता आदिवासी दुर्गम भागात रु.५५,०००/- व इतर भागात रु. ५०,०००/- एवढे मानधन राहील.

अटी व शर्ते :-

**अटी व शर्ते :-**

१.सदर तात्पुरती नियुक्ति केवह ११ महिन्यासाठी किंवा सदरपदावर नियमित वैद्यकीय अधिकारी उपलब्ध होईल त्या दिनांकापर्यत यापैकी जे अगोदन घडेल तो पर्यत अमलात राहील. त्यानंतर सदर नियुक्त्या आपोआप संपुष्ठा येईल.
२.सदर केवळ तात्पुरत्या स्वरुपात नेमणूका दिलेल्या तदर्थ वैद्यकीय अधिकारी याना वार्षिक वेतन वाढ अनुज्ञेय असणार नाही.
३.कंत्राटी कर्मचारी हे नियमित कर्मचा-यांप्रमाणे कोणतेही फायदे मिळविण्यांस पात्र असणार नाही.
४. नियमित वैद्यकीय अधिका-यां सारखे वेतन देण्यांत येणार नाही. म.ना.से (रजा) नियम लागू राहणार नाही.

५. सदर तदर्थ वैद्यकीय अधिका-यांना म.ना.से(वर्तणूक) नियम १९७९ मधील तरतूदी लागू होतील.

६.सदर तदर्थ वैद्यकीय अधिका-यांना सेवा काळात सेवामुक्त व्हायचे असल्यास त्यांना एक महिन्याची नोटीस किंवा एक महिन्याचे वेतन भरुन कार्यमुक्त होता येईल.

७. कंत्राटी वैद्यकीय अधिका-यांची सेवा खालील कारणास्तव समाधारकारक नसल्यास कोणत्याही क्षणी त्यांची कंत्राटी सेवा पूर्व सूचना न देता समाप्त करण्यांत येतील.

(अ) दोन दिवसापेक्षा जास्त कालावधीसाठी बिनापरवानगीने गैरहजर.

(ब) कामामध्ये निष्काळजीपणा

(क) बायोमेट्रिक प्रणालीवर हजेरी न लावणे

(ड) कामकाज अकार्यक्षम असणे/सेवेची कर्तव्ये व जवाबदा-या कटाक्षाने न पाळणे

(इ) गैरवर्तन / गैरव्यवहार केल्याचे निदर्शनास येणे

(फ) कार्यरत पदावर नियमित वैद्यकीय अधिका-यांची नियुक्ति झाल्यास.

८. अर्ज करणा-या उमेदवाराचे वय ५८ वर्षापेक्षा जास्त नसावे.

खालील वैद्यकीय अधिकारी कंत्राटी वैद्यकीय अधिकारी पदासाठी अर्ज करता येणार नाही.

(अ) कंत्राटी म्हणून नियुक्ती मिळाल्यानंतर कालावधी पूर्ण होण्यापूर्वी परवानगी न घेता गैरहजर असलेले व सोडून गेलेले वैद्यकीय अधिकारी

(ब) शिस्तभंगाच्या कारणास्तव सेवा समाप्त केलेले वैद्यकीय अधिकारी.

(क) अनाधिकृत गैरहजर असलेले व शासन सेवेतून काढून टाकलेले व संपामध्ये भाग घेतलेले वैद्यकीय अधिकारी.

स्वाक्षरी

अध्यक्ष,जिल्हा निवड समिती
तथा जिल्हाधिकारी
गडचिरोली

स्वाक्षरी

सदस्य सचिव, जिल्हा निवड समिती
तथा जिल्हा शल्य चिकित्सक
सामान्य रुग्णालय,गडचिरोली

प्रति,

मा.अध्यक्ष, जिल्हा निवड समिती
तथा जिल्हाधिकारी, गडचिरोली

विषय :- वैद्यकीय अधिकारी,एम.बी.बी.एस (कंत्राटी) पदाकरीता अर्ज.

पासपोर्ट साईझ फोटो लावावा

अर्जदाराचे पुर्ण नांव :......................................

पत्रव्यवहाराचा संपुर्ण पत्ता :......................................
......................................

दुरध्वनी क्र./मोबाईल क्र. :......................................

स्वतःचा E-mail ID :......................................

जन्मतारीख :......................................

जाहिरातीच्या दिनांकास वय : वर्षे............ महिने ............ दिवस ........

अनूभव असल्यास पदाचे नाव :........................ मानधन :..................

कार्यालयाचे नांव :................................................

**शैक्षणिक अहर्ता –**

| पात्रता परिक्षेचे नांव | विद्यापिठाचे नांव | अंतिम वर्षाचे गुण | | टक्केवारी | उत्तीर्ण वर्ष |
|---|---|---|---|---|---|
| | | एकूण गुण | मिळालेले गुण | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |

दिनांक :

स्थळ :

उमेदवाराची स्वाक्षरी